जाहिरात क्र. : **PRO/1201/ADV/2021-2022**
दिनांक : 30.09.2021

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांचे अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या 'PAP Management Unit' च्या विवक्षित कामासाठी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. 2715/प्र.क्र.100/13 दि. 17 डिसेंबर 2016 मधील अटी/शर्तीनुसार खालील नमूद करण्यात आलेली पदे **कंत्राटी तत्त्वावर** भरणेकरिता सेवानिवृत्त सक्षम उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवाराने संपूर्ण भरलेले अर्ज दि. **12.10.2021** पर्यंत कार्यालयीन वेळेत सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्या कार्यालयात सादर करावेत. अर्ज भरावयाच्या अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

| अ.क्र. | पदाचे नाव | **समाज विकास अधिकारी (Community Development Officer)** |
|---|---|---|
| 1. | पद संख्या | 01 (एक) |
| 2. | शैक्षणिक अर्हता | 1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाज कार्यातील पदव्युत्तर पदवी (Master of Social Work) उत्तीर्ण असावा.<br>2) उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किमान 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा. |
| 3. | अनुभव | खाली नमूद केलेल्या कामाचा 20 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांचा अनुभव असावा.<br>1) झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविणे.<br>2) झोपडपट्टीधारक / प्रकल्पबाधितांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था तयार करुन त्यांची नोंदणी (Registration) करणे, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे संघ (Federation) तयार करणे.<br>3) नोंदणी झालेल्या गृहनिर्माण संस्थांना सामाईक सुविधा प्राप्त करुन घेण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा, इ. प्राधिकरणांसमवेत समन्वय साधणे व पाठपुरावा करणे.<br>4) इमारतींच्या जमिनींचे अभिहस्तांतरण करणे.<br>5) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण / MMRDA यांजकडून Corpus Fund मिळवून देणे. |
| 4. | वयोमर्यादा | कमाल 65 वर्षे. |
| 5. | मानधन | मासिक रु. 45,000/- |

| अ.क्र. | पदाचे नाव | **सहाय्यक समाज विकास अधिकारी (Assistant Community Development Officer)** |
|---|---|---|
| 1. | पद संख्या | 01 (एक) |
| 2. | शैक्षणिक अर्हता | 1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाज कार्यातील पदवी (Bachelor of Social Work) उत्तीर्ण असावा.<br>2) उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किमान 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा. |
| 3. | अनुभव | खाली नमूद केलेल्या कामाचा 15 ते 20 वर्षे वर्षांचा अनुभव असावा.<br>1) झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविणे.<br>2) झोपडपट्टीधारक / प्रकल्पबाधितांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था तयार करुन त्यांची नोंदणी (Registration) करणे, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे संघ (Federation) तयार करणे.<br>3) नोंदणी झालेल्या गृहनिर्माण संस्थांना सामाईक सुविधा प्राप्त करुन घेण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा, इ. प्राधिकरणांसमवेत समन्वय साधणे व पाठपुरावा करणे.<br>4) इमारतींच्या जमिनींचे अभिहस्तांतरण करणे.<br>5) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण / MMRDA यांजकडून Corpus Fund मिळवून देणे. |
| 4. | वयोमर्यादा | कमाल 65 वर्षे. |
| 5. | मानधन | मासिक रु. 35,000/- |

<u>उमेदवारासाठी सर्वसाधारण सूचना :</u>

1. अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी ते पूर्ण करत असल्याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी आणि त्यानंतरच अर्ज करावा.
2. अर्हताधारक उमेदवाराने अर्ज फुलस्केप म्हणजेच (30 सेमी x 12 सेमी) आकाराच्या चांगल्या दर्जाच्या कागदावर टंकलिखित स्वरुपात सादर करावा. उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय व कामाचा पूर्वानुभव असलेल्या शासकीय/निमशासकीय संस्थेचे अनुभवाचे प्रमाणपत्र, चौकशीचे ना हरकत प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. तसेच मुलाखतीच्या वेळी अर्जासोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रतींसोबत उपस्थित राहणे आवश्यक आहे.
3. एकापेक्षा जास्त पदाकरिता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी वेगवेगळे व परिपूर्ण

अर्ज सादर करावेत.

4. उमेदवाराने स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदाच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करत आहेत. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास कंत्राटी सेवेतून कमी करण्यात येईल.
5. जाहिरातीमध्ये नमूद पदाची कमाल वयोमर्यादा 65 वर्षे इतकी असेल.
6. मुलाखतीसाठी उमेदवाराने स्वखर्चाने निर्धारित वेळेत उपस्थित रहावे.
7. अपूर्ण भरलेले अथवा विहित अर्हता धारण करित नसलेल्या उमेदवारांचे अर्ज कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील. यासाठी उमेदवारास लेखी कळविण्यात येणार नाही.
8. टपालाने / पोच देय टपालाने किंवा अन्य कारणास्तव अर्ज स्वीकारणेच्या अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही प्रकारे विचारात घेतले जाणार नाहीत.
9. पात्र अर्जाची स्वीकृती किंवा तो नाकारणे व निवडपद्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
10. मुलाखतीसाठीच्या उमेदवारांची नावे व भरती कार्यक्रम महानगरपालिका मुख्य इमारतीमधील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येतील.
11. मुलाखतीसाठीच्या उमेदवारांची नावे महानगरपालिका मुख्यालयातील सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) खात्याच्या नोटीस बोर्डावर स्वत: पाहून खात्री करुन घेणे जरुरीचे आहे.
12. उपरोक्त पदावर नियुक्तीचा कालावधी 1 (एक) वर्षाकरिता असेल व आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल.
13. सदरची नियुक्ती पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने ठोक मानधनावर करण्यात येणार असून, त्यास कोणतेही नियमित सेवाविषयक फायदे/ सवलत देय राहणार नाही. तसेच त्यांचा महानगरपालिकेतील कोणत्याही पदावर कोणताही अधिकार व हक्क असणार नाही आणि त्यासाठी त्याला कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.
14. करार पद्दतीने नियुक्त करावयाचा अधिकारी शारिरीक , मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा व त्याबाबतचे सक्षम वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करावे.
15. करार पद्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुद्ध कोणतीही विभागिय चौकशीसाठी कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. त्याबाबतचे संबंधित शासकीय/ निमशासकीय संस्था वा प्राधिकरणाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
16. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास दिनांक 17 डिसेंबर 2016 च्या शासन आदेशातील अटी/ शर्ती व महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचा बंधपत्र रु. 500/- च्या स्टम्प पेपरवर लिहून नोंदणीकृत नोटरी करुन द्यावा लागेल. सदर बंधपत्राच्या अधीन नियुक्ती असेल.
17. कंत्राटी तत्त्वावर समाज विकास अधिकारी (कंत्राटी) व सहाय्यक समाज विकास अधिकारी (कंत्राटी) यांच्यासोबत लेखी कंत्राट करार करण्यात येईल तसेच त्यांचेकडून सुयोग्य अनामत रक्कम(एक महिन्याचे वेतन) प्रचलित पद्धतीने घेण्यात येईल.

18. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, 1958 मधील अनुसूची 1 मधील अनुच्छेद 63 बाबत निर्गमित परिपत्रक क्र. ChE/BM/17800/II नुसार कंत्राट दस्ताएवजांवर सुयोग्य मुद्रांक शुल्काचा भरणा महाराष्ट्र शासनास उमेदवाराने करणे आवश्यक आहे.
19. बृहन्मुंबई महानगरपालिका परिपत्रक क्र. CA/FRG/05 दि. 24.04.2020 नुसार विधी शुल्क व लेखन सामुग्री आकार भरणा उमेदवाराने महानगरपालिकेस करणे आवश्यक आहे.
20. मुंबई महापालिका अधिनियम, 1888 मधील कलम 73 नुसार सदर समाज विकास अधिकारी (कंत्राटी) व सहाय्यक समाज विकास अधिकारी (कंत्राटी) यांच्याकडून प्रतिभूतीची मागणी करण्यात येईल आणि अशा प्रतिभूतीवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, 1958 मधील अनुसूची 1 मधील अनुच्छेद 54 नुसार प्रतिभुती बंधपत्र किंवा गहाणखत मधील तरतूदीनुसार योग्य अशा मुद्रांक शुल्काचा भरणा उमेदवाराने करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/- 17.06.2021 | सही/- | सही/- |
| (श्री. केशव उबाळे) | (श्री. रमेश पवार) | (डॉ. संजीवकुमार) |
| सहाय्यक आयुक्त(मालमत्ता) | सह आयुक्त (सुधार) | अतिरिक्त आयुक्त (शहर) |